युवा धोरण


डॉ. विष्णू श्रीमंगले
संचालक, मनोदय व्यसनमुक्ती



कोणत्याही देशाचा सर्वांगीण विकास हा त्या देशातील तरुणांच्या कार्यक्षमतेवर अवलंबून असतो. त्यामुळे देशातील तरुणाई नेमकं काय करते आहे, हे पाहणे फार महत्त्वाचे ठरते. भारतात आज रोजी वय वर्षे १० ते २९ दरम्यानच्या तरुणाईची संख्या २९ कोटींच्या घरात आहे. या हाताला काम दिले, तर वाईट गोष्टी कमी होतील.

# तरुणाई कमजोरी नव्हे बलस्थान बनेल!

संयुक्त राष्ट्र संघटनेच्या मते, जगातील सर्वाधिक तरुण सध्या भारतात राहतात. या तरुणाईला योग्य दिशा आणि हाताला काम देण्यात सरकार आणि सामाजिक संस्था कमी पडत आहेत. परिणामी, तरुणाई रोजगार मिळवण्याऐवजी विविध व्यसनांच्या आहारी जाताना दिसत आहे. अशा स्थितीत तरुणाई ही कमजोरी नव्हे, तर देशाची ताकद आहे, याचे भान राखून विविध उद्योग-व्यवसायांना गती देण्याची गरज आहे. अगदी ओला, उबेर, स्विगी, झोमॅटो, बिग बास्केट, ब्लिंककीट, दंझो, किसान मार्ट, झेप्टो, ॲमेझॉन, मेसो, फिल्प कार्ट अशा ऑनलाइन सेवा क्षेत्रात तरुणाई करिअर करू शकेल. यातून स्वत: आर्थिक सक्षम होण्यासह पुढील शिक्षण पूर्ण करताना दिसेल. पण, हे करत असताना शारीरिक आणि मानसिक आरोग्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. व्यवसायानुरूप शारीरिक व्याधी वेगवेगळ्या असून, त्यात वाढ होत आहेत. त्यातून सावरण्यासाठी कंपन्या आणि शासन स्तरावर विविध उपक्रम राबविणे गरजेचे आहे.

भारतातील युवक ही देशाची सर्वात मोठी आणि गतिशील लोकसंख्या गटांपैकी एक आहे. देशातील सुमारे ६५ टक्के लोकसंख्या ३५ वर्षांखालील आहे. यावरून देशाच्या विकासात युवकांची भूमिका किती महत्त्वाची आहे हे कळेल.

विकासाची वाटचाल करत असतानाच देशातील तरुणाईमध्ये व्यसनाचे प्रमाण वाढत असल्याची विदारक दुसरी बाजूदेखील समोर



येताना दिसत आहे. सन २००९ मध्ये आरोग्य मंत्रालयाने केलेल्या राष्ट्रीय कौटुंबिक सर्वेक्षण अहवालानुसार १५ ते २४ वयोगटात व्यसनाधीनतेचे प्रमाण वाढलेले आहे. या पिढीला व्यसनांपासून लांब ठेवण्यासाठी सर्व पातळ्यांवर काम होण्याची गरज आहे.

वेगवेगळ्या अभ्यासातून हे लक्षात आलेले आहे की, सामाजिक माध्यमांमुळे आणि आधुनिकीकरणामुळे अमली पदार्थ, तंबाखूजन्य पदार्थ, दारू, पॉर्न, ऑनलाइन जुगार यांना सहज एक्सपोजर मिळत असल्याने व्यसनाधीनतेला जणू सामाजिक अधिमान्यता मिळालेली दिसते. देशाचे भविष्य असलेली तरुणाई वास्तवाचे भान हरपून आभासी वास्तवात वावरताना दिसत आहे. त्यांना वेळीच यातून बाहेर काढल्यास देशाचा खऱ्या अर्थाने विकास होईल. भारत सरकारने २०१४ साली आणलेल्या राष्ट्रीय युवा धोरण आणि सन २०१२ मध्ये महाराष्ट्र शासनाने आणलेल्या युवा धोरणात प्रतिबंधात्मक उपयायोजना म्हणून काही ठोस तरतुदी आणण्याची गरज आहे. आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय लोकांत तसेच वस्ती पातळीवर व्यसनाधीनता वाढत असून, या वंचित गटातील तरुणांसाठी कौशल्याधारित नवीन कोर्सेस सुरू करण्याची गरज आहे. युवा धोरण समग्र, बहुआयामी आणि शाश्वत विकास ध्येय पूर्ण करणारा आराखडा आहे.

## डिजिटल व्यसनाधिनता

व्हाट्सॲप, इंस्टाग्राम, यूट्यूब, रील्स, पबजी आणि फ्री फायर यांसारखे ऑनलाइन खेळ, ओटीटीवरील विविध वेबसिरीज यांसारख्या सर्व प्रकारच्या सोशल मीडियामुळे तरुणाई डिजिटल व्यसनांमध्ये अडकलेली दिसत आहे. खरे तर तरुणांनी यामध्ये न अडकता डिजिटल कौशल्य विकसित करण्यावर भर दिला पाहिजे. यासाठी शासनस्तरावर विविध प्रकारचे कोर्सेस कमी शुल्कात उपलब्ध करून दिले पाहिजे. जग सतत बदलत असून, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआई) यावर आधारित युग अवतरले आहे. अशा काळात केवळ टिकणे नव्हे तर वेगळे अस्तित्व निर्माण करण्यासाठी तरुणांनी सतत शिकत राहिले पाहिजे. नवीन कौशल्य विकसित केले पाहिजे.


● संपादन : उद्धव धुमाळे, गणेश पिटेकर ● मांडणी सजावट : संदीप वाघमारे ● यशस्वी करिअरबाबत आपल्या टिप्स आणि अनुभव पाठवण्यासाठी ९७६२४१७१८४ या मोबाइल क्रमांकावर संपर्क साधावा.


29/7/25 Lokmat